NAAC Accreditied-2015
'B' Grade (CGPA 2.62)

## सोलापूर विद्यापीठ,कौशल्य विकास केंद्रामार्फत आयोजित

# थेरपेटिक न्यूट्रीशन व आहारशास्त्र प्रशिक्षण शिबीर

## दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८

## स्थळः-ऑडीटोरीयम,यशोधरा हॉस्पिटल,जिल्हा परिषद जवळ,सोलापूर

## वेळः सकाळी ८:०० ते १०.३०

थेरपेटिक न्यूट्रीशन हे अन्नाशी संबंधित शास्त्र आहे. पोषक द्रव्ये,अन्नघटक व पोषकता आणि त्यांचा शरीरावर होणारा परिणाम याचाच अभ्यास या शास्त्रात होतो. अन्नाबाबतीतील प्रत्येक गोष्ट,खाण्यापासून ते त्याचा निचरा होईपर्यंतच प्रत्येक गोष्ट न्यूट्रीशन मध्ये अंर्तभूत आहे. अन्नघटकांचे आरोग्यातील महत्व तसेच विविध आजारांमधील पोषण कसे असावे याचा अभ्यास थेरपेटिक न्यूट्रीशन या शास्त्राद्वारे केला जातो.

"आहार शास्त्र" हे योग्य आहार घेण्याची कला शिकवणारे शास्त्र असून विविध वयोगटातील,वेगवेगळया परिस्थितील लोकांच्या आरोग्य परिस्थितीनुसार व त्यांच्या आहाराच्या व पोषकतेच्या तत्वांचा यामध्ये अभ्यास केला जातो. समतोल आहार हे निरोगी जीवनाचे मूळ आहे. त्यामुळे शरीरप्रकृती चांगली रहाते, व रोगांपासूनही संरक्षण होते.

सोलापूर शहर झपाटयाने वाढत आहे. फास्ट फूड संस्कृती हळूहळू सोलापूर शहरात रूजत आहे आणि अशावेळी चुकीच्या आहारामुळे सामान्य जनतेस मधुमेह,उच्च रक्तदाब अशा लाईफस्टाईल आजारास सामोरे जावे लागत आहे. अशावेळी प्रत्येक व्यक्तीस आहार व पोषण यासंबंधी माहिती असणे गरजेचे आहे. नेमकी हीच गरज ओळखून सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राने दि.३ ते ९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत पोषण व आहारशास्त्र या विषयावबर प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केलेले आहे.

सदर प्रशिक्षण सर्वांसाठी खुले असून विशेषतःवैद्यकीय,नर्सिंग विद्यार्थी तसेच शारीरिक शिक्षण प्रशिक्षक यांच्यासाठी उपयुक्त असून सदर प्रशिक्षण शिबिरासाठी विद्यार्थ्यांना रू.२५०/- तर इतर व्यक्तीसांठी रू.७५०/- इतके नोंदणी शुल्क आकारण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबीर पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना/व्यक्तींना विद्यापीठ कौशल्य विकास केंद्रामार्फत प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सदर शिबीरासाठी नाव नोंदणी चालू झालेली असून ज्यांना नाव नोदणी करावयाची आहे, त्यांनी शिबीर समन्वयक डॉ.अभिजीत जगताप यांच्याशी ९७३०१०५९६१ अथवा (०२१७-२७४४७७४-Ext No-२२८) या क्रमांकावर संपर्क साधावा.

सोलापूर विद्यापीठ सोलापूर

# कौशल्य विकास केंद्र
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

आयोजित

## Therapeutic Nutrition & Dietetics Training Workshop
## (पोषण व आहारशास्त्र प्रशिक्षण शिबीर)




## दि.३ ते ९ ऑक्टोबर २०१८

**स्थळ: ऑडीटोरीयम, यशोधरा हॉस्पिटल, जिल्हा परिषद जवळ, सोलापूर**

सदर शिबिरामध्ये तज्ञ मार्गदर्शकांद्वारे Therapeutic Nutrition and Dietetics (पोषण व आहारशास्त्र)या विषयावर शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या व्यक्तींना सोलापूर विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राकडून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर शिबिराबाबतची विस्तृत माहिती सोलापूर विद्यापीठाच्या http://su.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर "कौशल्य विकास केंद्र" या शीर्षकाअंतर्गत उपलब्ध आहे. सदर प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना रु.२५० तर इतर व्यक्तींसाठीरु.७५० इतके शुल्क असून ज्या इच्छुकांना सदर शिबिरात नाव नोंदवायचे आहे त्यांनी विद्यापीठ वैद्यकीय अधिकारी डॉ.अभिजित जगताप यांच्याशी ९७३०१०५९६१ अथवा (०२१७-२७४४७७४ –Ext.२२८) या क्रमांकावर संपर्क साधावा.

सोलापूर विद्यापीठ सोलापूर